# University of Mumbai

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/७४२/२०१५

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक No.Exam/Sc/642 of 2015 दि. १७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये M.K.C.L. या अभिकरणामार्फत Online परीक्षाप्रवेश अर्ज स्विकारण्यात आलेल्या शिक्षणक्रमाचा विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाने घेतलेल्या अंतर्गत परीक्षांचे गुण Online पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत असे निर्दशनास येते की, अद्यापही बऱ्याचश्य: महाविद्यालयांकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षांचे गुण अद्याप Online पाठविण्यात आलेले नाही.

तरी याबाबत पुन:श्च असे कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पाठविले नसतील अशा महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पद्धतीने शक्य तितक्या लवकर पाठवावेत व त्याचे Hard Copy विद्यापीठाकडे जमा करावी.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या शिक्षणक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने स्विकारण्यात आलेले आहेत या शिक्षणक्रमासाठीचे विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही काही महाविद्यालयांकडून प्राप्त नाहीत. तरी ज्या महाविद्यालयाकडून या शिक्षणक्रमाचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही विद्यापीठात सादर केलेले नाही त्यांनी ते त्वरित सादर करावेत.

ज्या महाविद्यालयाकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण हे परिपत्रक मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात प्राप्त न झाल्यास त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व यांस संबंधीत महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. १० डिसेंबर, २०१५.

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित
१. मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे संचालक/प्रमुख, विविध विद्या शाखांचे अधिष्ठाते, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव
२. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
३. उपकुलसचिव, हस्तलिखीते विभाग, आवक जावक विभाग व केंद्रीय मुल्यांकन विभाग, वित्त व लेखा विभाग व पात्रता व स्थलांतर/नावनोंदणी विभाग

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
२. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
३. कूलसचिव यांचे स्विय सहायक
४. परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक